पुण्य नगरी
गुरुवार, ७ जानेवारी २०२१

# हिंदी भाषेतून देश-विदेशात रोजगाराच्या संधी

## प्रा. रुक्साना पठाण; शिवाजी कॉलेजमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात हिंदी विभागाच्या माजी विद्यार्थ्यांची ऑनलाईन सभा उत्साहात झाली. या सभेसाठी रयत संस्थेचे सचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शन लाभले. 'रयत शिक्षण संस्थेचे मूल्यविचार आणि शंभर वर्षांचे योगदान यामधून विद्यार्थी घडत आहेत. महाविद्यालय कालानुरूप नवीन आव्हानांना सामोरे जात आहे. महाविद्यालय स्वायत्त झाल्यामुळे हिंदी विभागाने रोजगाराच्या दृष्टीने कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमाबरोबर जीवनमूल्य रुजवण्यासाठी अभ्यासक्रमामध्ये अमुलाग्र परिवर्तन केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना याचा निश्चित फायदा होईल. हिंदी भाषा देश-विदेशा मध्ये शिकली व शिकवली जाते. त्यामुळे देश- विदेशामध्ये रोजगाराच्या संधी मिळत आहेत' असे मत हिंदी विभागप्रमुख प्रा. रुक्साना पठाण यांनी व्यक्त केले.

डॉ. संदीप किर्दत यांनी महाविद्यालामध्ये व विभागामध्ये राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील व प्राचार्य बॅरिस्टर पी. जी. पाटील स्पर्धा परीक्षा केंद्र, कमवा व शिका योजना, एन.सी.सी.युनिट, भरतीपूर्व प्रशिक्षण कोर्स, शॉर्ट टर्म कोर्स, कलाविष्कार, करिअर महोत्सव, लोकनेते रामशेठ ठाकूर भवन हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये महत्वाचे ठरत आहेत. विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे कार्यक्रम, योजना, स्पर्धा, अभ्यास सहली महाविद्यालयात राबवल्या जातात. हिंदी विभागामार्फत नेट-सेट मार्गदर्शन कार्यशाळा, सिनेमा साहित्यः सृजनात्मक संदर्भ या विषयावर राष्ट्रीय वेबिनार, हिंदी राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्याशी सामंजस्य करार ,अनुवाद- व्यावहारिक हिंदी या शॉर्ट-टर्म कोर्सच्या माध्यमातून विद्याार्थ्यांना रोजगाराच्या दिशेने नेले जात आहे, असेही डॉ. किर्दत यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या हिंदी विभागाने अनेक विद्यार्थी घडवले आहेत, त्यापैकी शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अभ्यास मंडळाचे विद्यमान चेअरमन प्रा. डॉ. राजेंद्र भोसले याच विभागाचे माजी विद्यार्थी आहेत. या बैठकीसाठी डॉ. हेमलता काटे, प्रा. अजित लिपारे, प्रा. प्रशांत चोरगे, डॉ. मंदाकिनी वर्णेकर, प्रा. गणेश खवळे, सचिन देशमुख, स्मिता शिंदे, सुजाता पाटोळे, स्वाती चव्हाण, इमाम पठाण आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. सादिक तांबोळी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. भूपेंद्र निकाळजे, प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी सूत्रसंचालन केले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा